INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625 E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

December 2020 Special Issue 256 (C)

## Multidisciplinary Research




**Guest Editor -**
**Prof. Dr. Rajani Shikhare,**
**Principal,**
**R. B. Attal College, Georai**
**Dist. - Beed.**

**Executive Editors :**
**Dr. B. D. Rupnar,**
**Dr. P. P. Pangrikar**
**Mr. S.S. Nagare**
**Mr. Ranjeet Pagore,**

**Chief Editor : Dr. Dhanraj T. Dhangar**

**This Journal is indexed in :**
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

**Impact Factor – 6.625** **E-ISSN – 2348-7143**

**INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S**

# RESEARCH JOURNEY

**International E-Research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**December 2020** **Special Issue 256 (C)**

## Multidisciplinary Research

**Guest Editor -**
**Prof. Dr. Rajani Shikhare,**
**Principal,**
**R. B. Attal College, Georai**
**Dist. - Beed.**

**Executive Editors :**
**Dr. B. D. Rupnar,**
**Dr. P. P. Pangrikar**
**Mr. S.S. Nagare**
**Mr. Ranjeet Pagore,**

**Chief Editor : Dr. Dhanraj T. Dhangar**

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

**SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS**

**For Details Visit To : www.researchjourney.net**

***Cover Photo (Source) : Internet**

**© All rights reserved with the authors & publisher**

**Price : Rs. 1000/-**

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Special Issue -256 (C) : Multidisciplinary Research
Peer Reviewed Journal

E-ISSN :
2348-7143
Dec. 2020

# INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Releastic Approach in R. K. Narayan's Novel *'The Guide'* | **Dr.V. S. Bandal** | **04** |
| 2 | Cultural Studies : An Introduction | **Mr. Arun Jadhav** | **11** |
| 3 | Sanitation and Social Change | **Mr. R. B. Kale** | **13** |
| 4 | Rotating Fluid of Magneto Hydrodynamics Flow Past an Impulsively Started Infinite Vertical Plate | **Vinod Kulkarni, Vijay Sangale** | **16** |
| 5 | An Efficient Synthesis of 5-Substituted 1H-Tetrazole Using Eton's Reagent in Water | **Rupnar B.D, Shirsat A.J. Jadhav S. B. Bhagat S.S.** | **22** |
| 6 | Crop Insurance in India | **B.S.Jogdand** | **27** |
| 7 | Outline of Modern Research | **Dr. Laxmikant Jirewad** | **31** |
| 8 | Second ARCs Views on Right to Information Act | **Hanmant Helambe** | **35** |
| 9 | An Introduction to Smart Libraries | **R.B. Pagore, Dr. B. V. Chalukya** | **38** |
| 10 | Impact of Cassine Albens Gum on Incidence of Seed Mycoflora in Different Crop Seeds | **K.V. Badar, P.P. Pangrikar** | **47** |
| 11 | Synthesis, Characterization and Antimicrobial Analysis of Some New Substituted Pyrazoles From Chromones | **Amol Shirsat, Balaji Rupnar, Sunil Bhagat** | **52** |
| 12 | Synthesis and Characterization of Ni (II) and Mn (II) Metal Complexes of Novel Schiff's Base Ligand | **Vrushali Gavhane, Anjali Rajbhoj, Suresh Gaikwad** | **57** |
| 13 | Image Classification Using Fuzzy Logic | **Pradeep Gaikwad** | **61** |
| 14 | Resistivity of Food Preservative Potassium Meta –Bisulphate Using (TDR) Technique | **S. G Badhe, S. N. Helambe, T. A.Prajapati** | **65** |
| 15 | Studies on Effects of Gamma Radiation on Iron Oxide in the Energy Range 122-1330 Kev | **Pradip S. Dahinde** | **68** |
| 16 | Effect of N-Fertilizers on Silage Fermentation | **Smita Basole , Sunita Bhosle and Prashant Pangrikar** | **74** |
| 17 | Investment Awareness Program (IAP): Need in Uncertain Market Conditions | **Dr. Sandip Vanjari** | **79** |
| 18 | Impact of Covid19 on Health and Hidden Cost of Covid | **Dr. Vivek Waykar** | **83** |
| 19 | Studies on Physico-Chemical Parameters of Bore Well Water in Satara Parisar, Aurangabad, India | **Jagannath Godse, Sanjay Ubale** | **86** |
| 20 | Synthesis and Antimicrobial Screening of Novel Pyrazole Substituted Chlorochromones | **S. S. Bhagat, B. D. Rupnar, A. J.Shirsat** | **89** |
| 21 | Women's Human Rights & Women Empowerment | **Dr. S.N. Satale** | **92** |
| 22 | Biodiversity of Butterflies Around Georai Region | **A. M. Budrukkar** | **96** |
| 23 | चूडिया की खनखनाहट और पायलों से फुटते विद्रोह का बिगुल : 'बेघर सपने' | **संतोष नागरे** | **99** |
| 24 | लोकनाट्य आणि समाजशास्त्र | **डॉ. संदीप बनसोडे** | **105** |
| 25 | मराठी भाषा आणि साहित्यासाठी एकविसाव्या शतकाची सुरुवात | **डॉ. समाधान इंगळे** | **107** |
| 26 | दलित स्त्री जीवन के शोषण का जिवंत दस्तावेज : 'जीवन हमारा' | **प्रो. रजनी शिखरे, राजाराम जाधव** | **110** |

E-ISSN :
2348-7143
Dec. 2020

# मराठी भाषा आणि साहित्यासाठी एकविसाव्या शतकाची सुरुवात

**डॉ. समाधान इंगळे**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
र. भ. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई, जि. बीड
drsamadhaningle@gmail.com, mob. 9422294002

स्वातंत्र्योत्तर काळात अत्यंत स्वाभाविकपणे मराठी साहित्यात निर्माण झालेले विविध वाङ्मयीन प्रवाह हा काळाचा व परिस्थितीचा अपरिहार्य रेटा होता. वर्ण व्यवस्था, सरंजामी व्यवस्था व परकीय सत्ता यांच्या प्रदीर्घ पार्श्वभूमीवर स्वातंत्र्यानंतरचा भारतीय समाज उभा होता. लोकशाही मूल्यांचे अधःपतन होत असल्याचे व वर्ण व्यवस्थेला पूरक राजकीय हितसंबंध प्रस्थापित होत असल्याचे चित्र दिसत असताना नुकतेच शैक्षणिक प्रवाहात सामील झालेले नवशिक्षीत लेखक, कवी यांनी आंदोलन उभारले. दलित साहित्यिकांनी या आंदोलनाचे नेतृत्व करून वर्ण व्यवस्थेच्या विरोधात लेखन करण्याची दिशा दिली. भारतीय सर्वच भाषांना प्रभावित करणारी ही मांडणी आंतरराष्ट्रीय स्तरावर मानव मुक्तीचा संघर्ष म्हणून नोंदवली गेली.

स्वातंत्र्यापर्यंत वर्ग व्यवस्थेच्या संदर्भात जाणवणारा हा लढा स्वातंत्र्योत्तर काळात वर्ण व्यवस्थेचा लढा झाला. मार्क्सवादी विचाराला पाठीमागे सोडत आंबेडकरी विचाराला अनुसरून एक सुस्पष्ट मांडणी केली गेली. दलित साहित्यामुळे इतर समाजघटकांतील लेखकांनी आपला सामाजिक परिसर साहित्यात साकारण्याला प्राधान्य दिले. दलित साहित्यिकांनी 'दलित' या संकल्पनेला सर्वव्यापक स्वरूप दिले असले तरी दलित म्हणजे चातुर्वर्णाच्या जात्यात ज्यांचे दळण झाले ते दळित म्हणजे दलित ही मांडणी अपील झाली नाही. गावकुसाआतील मराठा, कुणबी आणि शेतीशी संबधित जोडधंदे असणाऱ्या समाजांनी स्वतःला दलित म्हणवून घेण्यास नाकारले. वेशीच्या आतील आणि बाहेरील असा सरळ भेद दलित आणि दलितेत्तर या परस्पर भिन्न संकल्पना रूढ झाल्या. ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, अल्पसंख्याक साहित्य आणि प्रामुख्याने वर्ण - वर्गाधिष्ठित साहित्याच्या पलिकडे लिंगाधिष्ठित साहित्याला मिळालेल्या आंतरराष्ट्रीय आवाहनाला प्रतिसाद देत मराठीत स्त्रीवादी साहित्य अवतरले. ह्याचा अर्थ वर्ण, वर्ग आणि लिंग याविषयी असलेल्या सनातन दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठीची पिढ्यानपिढ्यांची घुसमट पहिल्यांदाच अक्षररूप धारण करू लागली होती. विभिन्न जाती, पोटजाती, धर्म, लिंग, गरीब - श्रीमंत ह्या भेदांना छेदण्याचे कार्य १९६० च्या नंतर मराठी साहित्यातील प्रवाहांनी केले. जात आणि धर्म विषयक लेखन आंदोलनाची तीक्ष्ण धार त्याच त्या प्रहारांनी बोथट झाली. या चळवळीला धार देणारा वर्ण संघर्षाचा भाव कालामानाने तेवढा तीव्र राहिला नाही. किंवा वर्ग संघर्ष हा भाव या साहित्य प्रवाहांच्या लढ्याला नसल्याने या चळवळीत जोम राहिला नाही. जातीच्या विखारी अत्याचाराची झळ शमली आणि सुरूवातीचा स्फोटक आवेगही कालांतराने शमला. विस्थापित प्रस्थापित झाले आणि प्रत्येक जातीत - धर्मा अंतर्गत गरीब - श्रीमंतीची दरी वाढत गेली. लोकशाहीच्या लाभधारकांनी आरक्षण आणि राजकारणाच्या माध्यमातून आपापल्या जातीतच उभी फूट पाडली. सर्वच जातीतील व धर्मातील श्रीमंतांनी संगनमताने आर्थिक शोषणाचा सपाटा लावला. कारखानदार, बहुराष्ट्रीय कंपन्या आणि भांडवलदार यांची चलती झाली. आणि संपूर्ण राजकारण या धनदांडग्यांच्या हातातील कळसूत्री झाल्याचे स्पष्ट चित्र दिसू लागले.

शिक्षणाचा प्रसार, सुशिक्षित बेरोजगार, सत्तेसाठी वाट्टेल ते, जागतिकीकरण, बाजारीकरण, खाजगीकरण या खुल्या बाजार नितीने भारतीय जनतेची संपूर्ण सुरक्षितता धोक्यात आली आणि १९९५ नंतरचे मराठी साहित्यातील आंतरबाह्य स्वरूप बदलून गेले. असुरक्षित समाजाच्या या भयग्रस्त वास्तवाचे भांडवल करणारी नवी राजकीय खेळी सुरू झाली. जात आणि धर्माच्या नावाने वर्षानुवर्षे पिडलेला समाज, स्वातंत्र्यानंतर जातीअंतासाठी आसुसलेला बुध्दिजीवी, साहित्यिक, सुशिक्षित समाज जातीच्या आणि धर्माच्या नावाखाली एकत्रित होऊ लागला. या संमिश्र परिस्थितीत, गोंधळलेल्या या वातावरणात एकीकडे साहित्य अनुदानावर भरविलेल्या संमेलनांमध्ये गुंतविले आणि दुसरीकडे संघर्ष करण्याची क्षमता असलेल्या लेखनाला बेदखल करण्याचे षडयंत्र रचले गेले. मनोरंजक साहित्याला अधिकाधिक महत्त्व देणारी प्रवृत्ती ह्याच काळात साहित्याचा मूळ उद्देश दिशाहीन करणारी होती. साहित्यिकांचे कंपू, साहित्य संस्थांचे राजकारण आणि जागतिकीकरणात दिशाहीन व साहित्यापासून तुटलेला वाचक, अशा परिस्थितीत साहित्यातील वेगवेगळया प्रवाहांना दिग्दर्शित करणारी व्यक्ती किंवा प्रवृत्ती दिसत नाही. मार्क्स, गांधी, फुले, शाहू, आंबेडकर या महापुरुषांच्या विचारांची प्रासंगिकता काही अपवाद वगळता लेखकांनी सहेतुकपणे डावलली. ह्याच कमर्शियल प्रवृत्तीचा शिरकाव साहित्यात झाल्याने प्रकाशकांचा पुस्तक प्रकाशित करण्यातील इंटरेस्ट बदलला. ललितेत्तर पुस्तकांचा आर्थिक व्यवहार जुळल्याने ललित पुस्तके प्रकाशित करण्याविषयीचे निर्माण झालेले औदासिन्य प्रचंड हानिकारक ठरले. उत्कृष्ट साहित्य भाषांतरीत होऊन उपलब्ध झाल्याने मराठी साहित्यासमोर एक वेगळेच आव्हान उभे राहिले.

या संपूर्ण परिस्थितीला तोंड देत, आर्थिक, सामाजिक, स्त्री- पुरूष विषमता या संदर्भाने १९८० नंतरचे मराठी साहित्यातील विविध प्रवाह क्षीण परंतु आपल्या अस्तित्वाची जाणीव देत राहिले. साहित्य प्रवाह आणि साहित्यिक क्षीण झाल्याने आंदोलनांचे नेतृत्व साहित्येत्तर मंडळींनी केले. अंधश्रद्धा, भ्रष्टाचार, आर्थिक शोषण, इतिहासाचे पुर्नरलेखन करणारी धुरीण मंडळी समोर आली. नरेंद्र दाभोलकर, गोविंद पानसरे, कलबुर्गी यांसारख्या मंडळीला लेखनामुळे आपल्या प्राणास मुकावे लागले. अशाप्रकारे लेखन करणारा कुणी ललित साहित्यिक या काळात पुढे आला नाही. भ्रष्टाचारमुक्त चळवळीचे नेतृत्व आण्णा हजारे या अराजकीय, असाहित्यिक व्यक्तीला करावे लागले. ह्याचा अर्थ या काळाला अपेक्षित असणारे ललित लेखक क्षीण झाले हाच आहे. साहित्याचे प्रादेशिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय सोहळे घडविण्यामध्ये व राजकीय कृपादृष्टी प्राप्त करण्यामध्ये प्रतिभा पणाला लागली. मात्र अनियतकालिकाच्या चळवळीने वाङ्मयीन प्रवाह आणि वाङ्मय प्रकार यांच्या साचेबंदपणाला खिळखिळे करण्याचे काम केले. त्यामुळे १९८० नंतरचे वाङ्मय प्रकार हे आपल्या मर्यादा ओलांडून पुढे येत आहे. प्रगत विचारही एका विशिष्ट ठिकाणी प्रस्थापित होतो आणि साचलेपणाच्या स्थितीला बाधा यावी तसा बाधित होतो. मुन्शी प्रेमचंद यांच्या लेखकाविषयी विवेचनाला तर अशा ठिकाणी अर्थपूर्ण रूप प्राप्त होते की, "लेखक हा स्वभावानेच प्रगतिशील असतो आणि जो प्रगतिशील नसतो तो लेखक नसतो" त्यामुळे आज जातीचे आरक्षण संपवून आर्थिक परिस्थितीनुसार आरक्षण लागू करावे यासाठी जाट, पटेल आणि महाराष्ट्रातील मराठ्यांचे अतिविराट क्रांती मोर्चे निघत आहेत. खुल्या बाजार नितीने व अमेरिकन सरकारच्या भल्यासाठी राबविल्या जाणाऱ्या धोरणामुळे २००० नंतरचे मराठी साहित्य हे वर्ग संघर्षाला दिग्दर्शित करणारे असेल, आणि जर तसे झाले नाही तर ते केवळ री घोट्या प्रकार होईल. यातच धक्कादायक गोष्ट म्हणजे महाराष्ट्र

E-ISSN : 2348-7143
Dec. 2020

शासनाने मराठी शाळा बंद करण्याचा धडाका लावला आहे. मराठी भाषेच्या अभिजात दर्जा भरून सातत्याने राजकारण केले जात आहे. शिवसेनेसारख्या पक्षाने मराठी बाणा दाखवत आपली सुरुवात केली खरी परंतु नंतर हिंदुत्वाचे राजकारण सुरू केले. त्याचीच री ओढत महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा राजकीय पक्ष स्थापन होऊन 'मुंबई मराठी भाषिकांची' अशाप्रकारे मराठी भाषेच्या भोवताली राजकारण फिरत राहिले, पण प्रत्यक्ष मराठीला याचा काहीही फायदा झाला नाही. निरक्षर आणि ग्रामीण भागातील गोरगरीब, कष्टाळू, शेतकरी अशाच लोकांकडे मराठी भाषा आणि संस्कृतीचा अस्सलपण टिकून आहे. सुशिक्षित आणि उच्चशिक्षित यांच्याकडूनच खऱ्या अर्थाने भाषेला धोका निर्माण झाला आहे. जिथे भाषाच संकटात सापडले आहे, तिथे भाषेतील साहित्य आणि त्या साहित्याची भूमिका आणि भूमिकेची आंदोलने किंवा चळवळी याचा विचार न केलेला बरा.

**संदर्भ ग्रंथ :**

1. तु. शं. कुळकर्णी, 'स्वातंत्र्योत्तर मराठी कविता: १९६१-८०', साहित्य अकादमी प्रकाशन न्यू दिल्ली, रिप्रिंट, २००८
2. रा. भा. पाटणकर, 'सौंदर्यमीमांसा', मौज प्रकाशन गृह, तिसरी आवृत्ती, २००१
3. प्र.न.जोशी, 'अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २०००
4. वा. ल. कुलकर्णी, 'स्वच्छंदतावाद'(रोमँटिसिझम), मराठी वाङ्मय कोश, महाराष्ट्र राज्य साहित्य, संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, २००२